IFSIJ IMPACT FACTOR: 6.225 ISSN: 2455-1511

# SANSKRUTI

## International Multidisciplinary Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL
Special Issue: 015 May- 2025




**Special Issue Editor:** I/C Prin. Prof. (Dr.) U. E. Salunkhe
**Coordinator, IQAC:** Dr. D. M. Bhise
**Conference Coordinator:** Dr. S. K. Naik
**Guest Editor:** Prof. Dr. M.A. Kadam-Patil
**Editor-in-Chief:** Prof. Santosh Bongale

IFSIJ IMPACT FACTOR: 6.225 ISSN: 2455-1511

# SANSKRUTI

## International Multidisciplinary Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue: 015 May - 2025

"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

## Kakasaheb Chavan College, Talmavale

Tal. Patan, Dist- Satara. 415103 (Maharashtra)

Accredited with 'B++' Grade with 2.77CGPA
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

One Day Online Multidisciplinary National Conference

On

## Innovation for Sustainable Development and Restoration of Environment

Organized by

INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)
On
Thursday, 6th March, 2025

Special Issue Editor: I/C Prin. Prof. (Dr.) U. E. Salunkhe
Coordinator, IQAC: Dr. D. M. Bhise
Conference Coordinator: Dr. S. K. Naik
Guest Editor: Prof. Dr. M.A. Kadam-Patil
Editor-in-Chief: Prof. Santosh Bongale

| | | |
|---|---|---|
| 14 | *Environmental Sustainability in Sarnath Banerjee's All Quiet in Vikaspuri*<br>*Dr. Digambar M. Bhise* | 80-83 |
| 15 | *Naturalism in Ralph Waldo Emerson's Nature and Self Reliance Smt.Kiran Pandurang Katkar* | 84-85 |
| 16 | *Economic and Environment Sustainability in the Graphic Novel All Quiet in Vikaspuri; An Interdisciplinary Approach*<br>*Dr. Digambar M. Bhise* | 86-90 |
| 17 | *लिंगायत संतांचा मराठी साहित्यावरील प्रभाव*<br>*आरती अनिल जायगांवकर,डॉ. योगेश हिरामण महाले, डॉ. वासुदेव सोमाजी वले* | 91-94 |
| 18 | *मराठी साहित्य आणि पर्यावरण*<br>*प्रा. संतोषकुमार बाळकृष्ण डफळापूरकर* | 95-96 |
| 19 | *निसर्गकवी ना. धों. महानोर*<br>*प्रा. कपिल कांबळे* | 97-99 |
| 20 | *पर्यावरणाविषयी सजग समाजभान जपणारे कादंबरीकार: कृष्णात खोत*<br>*डॉ. गवराम नाना पोटे* | 100-103 |
| 21 | *युद्धाचा पर्यावरणावर होणारा परिणाम*<br>*प्रा. डॉ. विजया पाटील* | 104-108 |
| 22 | *मराठी संत साहित्य: पर्यावरण आणि शाश्वत विकास*<br>*सौ. कांचन कृष्णत थोरात* | 109-114 |
| 23 | *पर्यावरण विषयक चित्रपट*<br>*डॉ. हेमंत नामदेव कुंभार* | 115-118 |
| 24 | *चंद्रकुमार नलगे यांच्या 'देवाची साक्ष' या कांदबरीतील समस्या आणि संघर्ष*<br>*प्रा. माधवी सुरेंद्र पवार* | 119-123 |
| 25 | *'एका लोकलढ्याची यशोगाथा' मधील पर्यावरण चित्रण*<br>*डॉ. प्रा. राजेंद्र सिताराम लादे* | 124-127 |
| 26 | *अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्रीवादी विचार*<br>*प्रा. प्रदीप सहदेव चोपडे* | 128-131 |
| 27 | *युद्धाचा पर्यावरणावरील परिणाम*<br>*सौ. माधवी मुकुंद शिनगारे* | 132-139 |

Sanskruti International Multidisciplinary Research Journal
IMPACT FACTOR - (IFSIJ) – 6.225
Special Issue 015- "Innovation for Sustainable Development and Restoration of Environment"
ISSN: 2455-1511
May- 2025

# अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्रीवादी विचार

**प्रा. प्रदीप सहदेव चोपडे**

वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

**प्रस्तावना:**

*मराठी वाङ्मयात १९६० नंतर विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्यामधील एक महत्त्वपूर्ण साहित्य प्रवाह म्हणून स्त्रीवादी साहित्य प्रवाह ओळखला जातो. परंतु स्त्रीवादी साहित्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाश्चात्य देशातून आलेली आहे. स्त्रीवादी म्हणजे स्त्रियांचा आत्मसन्मान जपणारे, तिच्या आचार-विचार आणि उच्चार स्वातंत्र्याचा आदर करणारे विचार असे मानले जाते. स्त्रीचे अस्मितामूल्य प्रस्थापित करणाऱ्या संघर्षातूनच स्त्रीवादाचा जन्म झाला आहे. मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्य प्रवाहामध्ये विपुल प्रमाणात लेखन झाले आहे. स्त्रीवादी साहित्यप्रवाह महाराष्ट्रामध्ये मराठी साहित्यात रुजण्यापूर्वीच अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या कादंबऱ्यांमधून स्त्रीवादी विचारधारेचे चित्रण केलेले आहे. त्याचा आढावा या निबंधामध्ये घेतलेला आहे*

*स्त्री आणि पुरुष असा भेद निसर्गनिर्मित असला तरी पुरुष प्रधान व्यवस्थेने स्त्रियांना सतत दुय्यम स्थान दिले आहे. 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हति' या पारंपरिक चौकटीत तिला बसवून केवळ स्त्रीला एका उपभोगाचे साधन बनविले आहे. स्त्रीचे माणूसपण हिरावून घेऊन तिच्या आचार विचारावर मोठ्या प्रमाणात बंधने घातली गेली. संपूर्ण जगामध्ये स्त्रियांना मिळालेल्या या दुय्यमपणाबद्दल विरोध होऊ लागला, त्यामधूनच पाश्चात्य देशात स्त्रीवादी विचारसरणीला सुरुवात झाली. कालांतराने भारतामध्ये ही स्त्रीवादी विचारसरणी उदयास आली. परंतु भारतात स्त्रीवादी चळवळीच्या जागृती पूर्वीच बौद्ध काळामध्ये स्त्रियांना समानतेची वागणूक दिली जात होती. नंतर स्त्रियांच्यावरती पुरुषप्रधान व्यवस्थेने अनेक बंधने लादली. या बंधनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्रियांना मुक्त केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेतून स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच हक्क व अधिकार मिळवून दिले. भारतीय स्त्रियांना आपल्या हक्क अधिकारासाठी आंदोलन करावे लागले नाहीत परंतु त्या हक्काची अधिकारांची अंमलबजावणी प्रस्थापित करण्यासाठी मात्र स्त्रियांना संघर्ष करावा लागत आहे. भारतातील स्त्रीवाद खऱ्या अर्थाने येथील पुरुष समाजसुधारकांनी सुरू केला त्यांच्या लेखणीत व कार्यामध्ये स्त्रीवादी प्रवाहाची मांडणी केलेली दिसून येते. अण्णाभाऊ साठे यांनी महाराष्ट्रात स्त्रीवादी साहित्य प्रवाह निर्माण होण्यापूर्वीच आपल्या कादंबऱ्यांमधून स्त्री पात्रांचे चित्रण स्त्रीवादी दृष्टिकोनातून केलेले आहे. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.*

***कळ शब्द: अण्णाभाऊ साठे, स्त्रीवादी साहित्य, स्त्रीवाद , फेमिनिझम***

**स्त्रीवादी संकल्पना :**

साधारणपणे १९६० नंतर स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची संकल्पना मराठी साहित्यात निर्माण झाली आहे. स्त्रीवादी संकल्पनेत फिमेल -स्त्री, फेमिनिझम – स्त्री प्राधान्य, फेमिनिस्ट - स्त्रीवादी या संज्ञांचा विचार केला जातो. 'स्त्रीवादी म्हणजे स्त्रियांचा आत्मसन्मान जपणारे, तिचा आचार, विचार आणि उच्चार स्वातंत्र्याचा आदर करणारे साहित्य असे मानले जाते' याविषयी डॉ. मंगला वरखेडे म्हणतात, "पुरुषप्रधान संस्कृतीने ज्या मानवी हक्कापासून स्त्रियांना वर्षानुवर्षे वंचित केले ते हक्क मिळवण्यासाठी स्त्रियांनी स्त्रियांच्या व्यक्ती स्वातंत्र्यासाठी, विचार स्वातंत्र्यासाठी आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी केलेली चळवळ म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय".[१] स्त्रीवादी संकल्पनेच्या मुळाशी पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्री वरती लादलेल्या बंधनाविरोधात चळवळ उभी करणे हा हेतू आहे. त्या चळवळीत पुरुषांना विरोध नाही तर पुरुषांच्या बरोबरीने समता, हक्क व अधिकार मिळाले पाहिजेत अशी त्यांची धारणा आहे.

यासंबंधीचे विवेचन डॉ. अश्विनी धोंगडे म्हणतात, "स्त्रीवाद म्हणजे पुरुषापासून हरकत घेऊन स्त्रीने आपला सवतासुभा निर्माण करणे नव्हे, तर स्वतःच्या सामर्थ्याचा शोध घेऊन, स्वतःला ओळखून, आपल्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळवण्यासाठी त्याच्या खांद्याला खांदा लावून जीवन जगण्यासाठी, पितृसत्ताक समाज व्यवस्थेने प्रस्थापित केलेल्या परंपरा मोडून आपल्या विकासाचा आपणच मार्ग ओळखणे म्हणजे स्त्रीवाद"[२] अशी व्याख्या केली आहे. स्त्रीवादी विचारसरणीची काही पायाभूत तत्वे आहेत. ती म्हणजे १) स्त्री-पुरुष समानता २) स्त्रीचा माणूस म्हणून विचार ३) मानवी हक्कांची प्राप्ती ४) पुरुषसत्ताक कुटुंब व्यवस्था नाकारणे ५) स्त्रीचा मानसिक विकास घडवून आणणे इत्यादी पायाभूत तत्वे स्त्रीवादी विचारसरणीमध्ये आधारभूत आहेत यावरच स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची निर्मिती झालेली दिसून येते.

**स्त्रीवादी साहित्य:**

स्त्रीवादाची विचारसरणी जशी रुजत गेली, तसे स्त्रीवादी साहित्य निर्माण होऊ लागले. साधारणपणे ज्या साहित्यातून स्त्रीवादाच्या विचारसरणी प्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्री मनाचा, कृतीचा, जीवनाचा आणि असे करताना निर्माण झालेल्या संघर्षाचा आविष्कार घडवते त्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल. केवळ स्त्रियांनी लिहिलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य अशी व्याख्या करता येणार नाही. कारण सर्वच स्त्रियांच्या लेखनात स्त्रीवादी विचारसरणी असू शकते असे नाही, तर स्त्रीवादी विचारसरणी म्हणजे एक जाणीव आहे. जसजसा या जाणिवेचा विकास होत जाईल तसतशी ती विचारसरणी रुजत जाईल. एकूणच ज्या साहित्यात स्त्रीवादी जाणिवा आढळतील ते साहित्य स्त्रीचे असो पुरुषाचे ते साहित्य स्त्रीवादी साहित्य मानता येईल. स्त्रीच्या आत्मशोधाचा तत्त्वाचा, अस्तित्वाचा शोध घेणारी जाणीव स्त्रीवादी साहित्याच्या केंद्रस्थानी असते.

महाराष्ट्रामध्ये स्त्रीवादी विचारसरणी रुजण्यापूर्वी १८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हा शोध निबंध लिहून पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेला जाब विचारला होता. त्यानंतर महात्मा फुले, पंडिता रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले, डॉ,बाबासाहेब आंबेडकर, मुक्ता साळवे यांनी आपल्या लेखणीमधून स्त्रीविषयक जाणीवा प्रकट केलेल्या दिसून येतात. त्यांच्या लेखणीत स्त्री-पुरुष समानतेवर आधारलेले नवे विश्व निर्माण करण्याची अपेक्षा होती. डॉ. विद्युत भागवत त्यांच्या मते, "मानव म्हणजे पुरुष, स्त्री हे त्याचे उपांग ह्या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न निर्माण करणारे, त्यातील जटिलता, धूसरता मांडणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल".[३] या व्याख्येवरून वरील समाज सुधारकांनी स्त्रीवादी स्वरूपाची लेखणी योग्य आहे असे म्हणता येते.

महाराष्ट्रातील स्त्रीवादी विचारसरणीनुसार सुरुवातीच्या काळात काशीबाई कानिटकर, कृष्णाबाई मोटे, विभावरी शिरूरकर, मालतीबाई दांडेकर, कुसुमावती देशपांडे, गीता साने, आनंदीबाई शिर्के, सोमती क्षेत्रमाडे योगिनी, योगिनी जोगळेकर, शैलेजा राजे, शकुंतला गोगटे, अरुणा ढेरे, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, मेघना पेठे, अंबिका सरकार इत्यादी लेखिकांनी लेखन केले आहे. त्यामध्ये स्त्री शिक्षण, पुनर्विवाह, विधवा समस्या, बालविवाह, तसेच नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या याचे चित्रण केलेले दिसून येते. स्त्री वर्गाचे दुःख या सर्वच लेखिकांनी स्त्रीच्या अनुभवातून रेखाटले आहे. त्यामुळे ते वास्तवपूर्ण आपल्या स्त्रीवादी जाणिवेतून लिहिलेले साहित्य आहे हे दिसून येते.

**अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील स्त्रीवाद:**

स्त्रीवादी लेखिकांप्रमाणेच अण्णाभाऊ साठे यांनीही स्त्री जाणीवेतून आपल्या कादंबऱ्यांमध्ये स्त्रियांच्या विषयी लेखन केलेले आहे. अण्णाभाऊ साठे मराठी साहित्यातील एक महत्त्वपूर्ण लेखक आहेत. १ ऑगस्ट१९२० साली जन्मलेले अण्णाभाऊ यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांनी एकूण ३५ कादंबऱ्या लिहिल्या त्यापैकी १५ कादंबऱ्या या स्त्रीप्रधान

कादंबऱ्या आहेत. पोवाडा, लावणी, कथासंग्रह, नाटक, लोकनाट्य असे त्यांचे विपुल लेखन आहे, त्यांच्या अनेक कथा व कादंबऱ्यावर चित्रपटाची निर्मिती झालेली आहे. उणेपुरे ४८ वर्षे आयुष्य लाभलेल्या त्यांच्या जीवन संघर्षात त्यानी स्त्रिया, दलित, मजूर, गाव कुसाबाहेरील भटके, गावगाड्यातील बारा बलुतेदार यांचा जीवन संघर्ष त्यांच्या लेखणीतून मांडलेला आहे. खास करून स्त्रियांविषयी सोषिकतेने लिहिणारे मराठी साहित्यातील ते एक जाणकार लेखक होते.

‘चित्रा’ ही त्यांची पहिली स्त्रीप्रधान कादंबरी या कादंबरीत त्यांनी चित्रा या नायिकेचा सख्खा मामा तिच्या बहिणीची ‘सोना’ हिची फसवणूक करून तिला वेश्या बाजारात विकतो, नाईलाजाने तिला तो व्यवसाय करावा लागतो. पण मामा सोनाची बहीण चित्रा हिलाही फसवून त्या बाजारामध्ये घेऊन येतो. तेंव्हा कणखर अशा बाऱ्याची चित्रा स्वतंत्र विचाराने आपल्या जीवनाचा मार्ग निवडते. वेश्या बाजारातून बाहेर पडून चारित्र्यसंपन्न आयुष्याची निवड करते. गिरणी कामगार म्हणून कष्ट सहन करते व स्वतःचे अस्तित्व निर्माण करते. याचे चित्रण त्यांच्या ‘चित्रा’ या कादंबरीमध्ये दिसून येते. त्यानंतर ‘मंगला’ या कादंबरीत चलेजावच्या आंदोलनातील आपल्या देशभक्त पतीला लढ्यात साथ देणारी, प्रसंगी खांद्यावर बंदूक घेऊन इंग्रजाविरुद्ध लढणारी नायिका चित्रित केली आहे. तर ‘वैजयंता’ ही तमाशा कलावंताची कादंबरी आहे. नर्तिकेच्या वाट्याला येणारे दुःख भोग सहन करून चारित्र्य जपणारी नायिका ‘वैजयंता’ या कादंबरीतून दिसून येते. वैजयंताची कलावंत ही स्वच्छ प्रतिमा चित्रीत करून तिच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याची स्त्रीवादी भूमिका अण्णाभाऊंनी मांडलेली आहे.

‘चंदन’ ही मुंबई शहराच्या झोपडपट्टी मधील मानवी जीवन चित्रीत करणारी कादंबरी. तरुण विधवा झोपडपट्टीतील वासनांध वातावरणामधून संघर्षपूर्ण रीतीने आपले शील कसे जपते याचे चित्रण त्यांच्या या कादंबरीत दिसून येते. येणाऱ्या प्रसंगाला धैर्याने तोंड देणारे व आपले जीवन संघर्षपूर्ण रीतीने जगणारे कामगाराचे जीवन जगणारी चंदनची एक शौर्यगाथा या कादंबरीमध्ये दिसून येते. ‘सीता’ या कादंबरीत समाजातील अंधश्रद्धेला स्त्रिया कशा बळी पडतात? स्त्रीला दास्यात ठेवणारी, केवळ भोगवस्तू म्हणून पाहण्याची ही प्रथा स्त्रीचे आयुष्य कसे उध्वस्त करते, यातून बाहेर पडण्याचे आत्मिक बळ अण्णाभाऊ या कादंबरीतून देतात. रामायणात ज्याप्रमाणे सीतेने शेवटी रामाला त्यागून स्वतंत्र वृत्तीने जीवन जगले; त्याप्रमाणेच कादंबरीतील सीता स्वाभिमानी बाणा आत्मसात करताना दिसून येते. तर ‘आवडी’ या कादंबरीत स्वतःच्या सख्ख्या भावाने फसवणूक केल्यानंतर आपले संपूर्ण आयुष्य दुःखात लोटण्यापेक्षा आपल्या आवडीनुसार आयुष्य जगणारी बंडखोर आवडी अण्णाभाऊंनी चित्रित केली आहे. पुरुषप्रधान संस्कृतीपुढे न झुकता आम्ही आमचे आयुष्य जगण्याला स्वतंत्र आहोत हेच या कादंबरीतून त्यांनी दाखवून दिले आहे.

स्त्री ही स्त्री असते. तिला इतर जातीची, वर्णाची लेबल लावली तरी प्रत्येक स्त्रीचे चारित्र्य तिला जिवाहुन प्रिय असते. ‘माकडीचा माळ’ कादंबरीत डवरी, गोसावी, माकडवाले, फासेपारधी अशा भटक्या भणग जमातीतील मुलींनाही इज्जत असते, फाटक्या संसारातही त्या आपले शील सांभाळण्याचे सामर्थ्य ठेवतात हे दुर्गाच्या चित्रणावरून दिसून येते. संकटावर मात करीत जिद्दीने जगण्याची वृत्ती अण्णाभाऊंच्या कादंबरीतील या पात्रातून दिसून येते. ‘रत्ना’ या कादंबरीत एका सैनिकाची पत्नी जिच्यावर नवऱ्याचा मित्र बलात्कार करतो. तिचा काही दोष नसताना तिला पीडित जीवन जगावे लागते. शेवटी पती बलात्कारी पत्नीला स्वीकारून स्त्री जातीबद्दल आदर व्यक्त करतो. स्त्रीला अपमानित न करता तिचे उध्वस्त जीवन पुन्हा सावरण्याची संधी द्यावी हा संदेश अण्णाभाऊंनी या कादंबऱ्यातून दिला आहे.

याप्रमाणे अण्णाभाऊ साठे स्त्रीप्रधान कादंबरीमध्ये स्त्री जीवनात स्त्रियांच्या स्त्री विचारांना प्राधान्य देतात. स्त्रियांनी अन्याय, अत्याचार सहन करीत पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडाखाली आपले जीवन जगावे हे अण्णाभाऊ साठे यांना मान्य नाही. स्त्रीवादी विचारसरणीमध्ये अशा विचारांना प्राधान्य आहे. एक माणूस म्हणून स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने जीवन जगण्याचा अधिकार मिळाला

पाहिजे ही स्त्रीवादी विचारसरणी त्यांच्या कादंबरीमध्ये प्रत्येक पानावरती दिसून येते. अण्णाभाऊंच्या नायिका ‘नशिबाचे भोग’ म्हणून कुढत न बसता प्रसंगी त्यातून पेटून उठण्याची ताकद दर्शवितात. त्यांच्या नायिका या ग्रामीण भागातील अशिक्षित, काही शिक्षित, काही अर्धशिक्षित, कष्टकरी, शोषित वंचित उपेक्षित भटक्या शेतकरी कुटुंबातील आहेत परंतु त्या सत्वशील व सुशील आहेत. तसेच मानवतावाद जोपासणाऱ्या आहेत. अन्यायाविरुद्ध व पिळवणूकी विरुद्ध बंड करणाऱ्या, लढाऊ बाण्याच्या, परिस्थितीला शरण न जाणाऱ्या, प्रसंगी संघर्ष करून येणाऱ्या प्रसंगाला तोंड देणाऱ्या आहेत.

अण्णाभाऊंच्या कादंबरीतील स्त्री ही आबला नसून तिलाही स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. स्वतःच्या अस्मितेसाठी संघर्ष करणारी ती आहे. त्या दलित, उपेक्षित, आर्थिक दृष्ट्या दुर्बल, अशिक्षित असूनही केवळ चूल आणि मूल सांभाळणाऱ्या नाहीत; तर समाजातील रूढी, प्रथा परंपरांना छेद देऊन रात्र दिवस कष्ट करून स्वतःचे जीवन जगणाऱ्या व कुटुंबाचा सांभाळ करणाऱ्या आहेत. त्यांना स्वातंत्र्य पुरुषी वर्चस्व झुगारून स्वैर वृत्तीने जीवन जगण्यासाठी नको आहे. तर स्वाभिमानी जीवन जगण्यासाठी पाहिजे आहे. हाच स्त्रीवादी दृष्टिकोन अण्णाभाऊ साठे यांच्या अनेक कादंबरीतून दिसून येतो.

एकूणच त्यांच्या सर्व कादंबऱ्यांमधून चित्रित होणारी स्त्रीची पात्रे ही मनोरंजनासाठी किंवा शृंगारिक चित्रणासाठी कादंबरीमध्ये येत नाहीत. तर त्यांचा जीवन संघर्ष त्यांनी कादंबऱ्यातून मांडला आहे. याविषयी डॉ. उज्वला हातागळे म्हणतात, “अण्णाभाऊंच्या कादंबरीतील स्त्री पात्रे आपल्याच दुःखाला कुरवाळत न बसता इतरांचे दुःख दूर करण्यासाठी पुढाकार घेऊन ते दूर करतात. म्हणून त्यांच्या या विचारांना व्यापकता येते व दृष्टिकोन विशाल होतो. कठीण परिस्थितीतही आपल्या भवितव्याचा, आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या भवितव्याचा, आपल्या ध्येयाचा विचार करणाऱ्या झुंजार लढाऊ वृत्तीच्या बंडखोर तडफदार तेजस्वी व्यक्तिमत्त्वाच्या या सर्व नायिका संघर्ष करतात व आजच्या स्त्रियांनाही स्फूर्ती व जगण्याची प्रेरणा देणाऱ्या ठरतात”.[४] अशाप्रकारे अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायिका या स्त्रीवादी विचारसरणीनुसार जीवन जगणाऱ्या श्रेष्ठ नायिका का ठरतात हे यातून दिसून येते.

**निष्कर्ष**

स्त्री जीवनाचा मानवतावादातून आणि व्यापकतेने विचार नायिकांच्या व्यक्तिरेखेतून अण्णाभाऊंनी मांडला आहे.
कादंबरीतील नायिका आपल्या नितीमूल्यांची जपणूक प्राणपणाने करताना दिसून येतात.
मंगला, दुर्गा, चंदन, चित्रा, आवडी, वैजंता या नायिका पिळवणूकी विरुद्ध बंड करताना दिसून येतात.
स्त्रियांच्या विविध समस्या मांडून त्या समस्यांची उकल नायिकांच्या व्यक्तिरेखेतून प्रभावीपणे केली आहे.
या सर्व नायिकांचे चित्रण स्त्रीवादी विचारसरणीची जाणीव घडवून देणारे आहे

**संदर्भ-**

महाजन वंदना, वामन मल्हार जोशी लिखित मराठी कादंबरीतील स्त्रीवाद, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१०, पृष्ठ क्र. १३ .
धोगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे, प्रथमावृत्ती, १९९३, पृष्ठ क्र.६२ .
भागवत विद्धुत , स्त्रीप्रश्नाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००४, पृष्ठ क्र. १०८.
हातागळे उज्वला, अण्णाभाऊ साठे लिखित स्त्री संघर्ष गाथा, स्नेहवर्धन प्रकाशन , पुणे, प्रथमावृत्ती २०१९ , पृष्ठ क्र. २५३ .